# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रम 2023-24 प्रवेश प्रक्रिया (पूर्वतयारी)**

**संदर्भ :**
1. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. 196/2023 दिनांक: 04/09/2023**
2. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. शै. प्रवेश/3910 दिनांक: 20/09/2023**
3. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. शै. प्रवेश/4030 दिनांक: 30/09/2023**

**(पीएच.डी. अभ्यासक्रम 2023 प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त संशोधन केंद्र/संशोधक मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यास मुदतवाढीबाबत.)**

सदर परिपत्रकाव्दारे मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना कळविण्यात येते की, पीएच.डी. मान्यताप्राप्त संशोधक मार्गदर्शकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्यासाठी संशोधन केंद्र व संशोधक मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिनांक 31 ऑक्टोबर, 2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. 020-71533633 अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

तसेच संदर्भिय परिपत्रक क्र. 1 अन्वये प्रक्रिया -3 मध्ये नमूद मुद्दा क्र. 4 केल्यानुसार प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती भरल्यानंतर त्याची प्रिंट घेऊन (बीओडी लॉगीनमधून डाऊनलौड करून) त्यावर प्राचार्य/संचालक यांचे सही व शिक्क्यासह एक प्रत दि. 02 नोव्हेंबर , 2023 पर्यंत शैक्षणिक प्रवेश विभागात जमा करावी.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग

संदर्भ: शै.प्रवेश/4166
दिनांक: 10/10/2023

**प्रत:**

| | |
|---|---|
| 1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे<br>2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधक मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी. |